| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२१३१/२०१५ |
| सरकार वि. दिपा व १ |
| निशाणी क्र.१७ |

**सरकारतर्फे साक्षदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | : | - सखाराम सटवाजी मोले |
| वय | : | - ४५ वर्ष |
| धंदा | : | - पो.उप. अधिक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर. |
| राहणार | : | - श्रीकृष्ण नगर, नंदनवन, नागपूर. |

**सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.एम. दुंगे यांचेकडून**

१. दिनांक २१.०५.२०१५ रोजी पोलीस ठाणे लकडगंज येथे सहा.पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी माझी रात्री २१.०० ते दुस-या दिवशी सकाळी ९.०० वाजेपर्यंत रात्रपाळी डयुटी होती. मी डयुटीवर असतांना पी.एस.आय. उमाकांत राठोड यांनी गंगा जमुना परिसरातील पिटा ॲक्टप्रमाणे कार्यवाही करून महिला आरोपी दिपा किसन धनावत यांना पोलीस ठाण्यात घेवून आले होते. त्यांनी माझ्याकडे फिर्याद व घटनास्थळ पंचनामा दिला. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद व घटनास्थळ पंचनामा तेच आहेत, त्यावर पी.एस.आय. उमाकांत राठोड यांची सही आहे. आम्ही एकाच पोलीस ठाण्यात कार्यरत होतो म्हणून मी त्यांची सही ओळखतो. त्यावरून मी अपराध क्र.३५२३/२०१५ कलम ७ व ८ अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा अंतर्गत दाखल केला. मला आता दाखविण्यात आलेला छापील प्रथम खबर अहवाल बरोबर आहे. त्यावर माझी व पी.एस.आय. राठोड यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर रिपोर्टप्रमाणे नोंदवला असून ते बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येते.

२. आरोपी दिपा धनावत यांना अटक करून तसा अटक फॉर्म तयार केला. आता मला अटक फॉर्म दाखविला, तो बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

तसेच त्यावर साक्षीदाराचा निशाणी अंगठा आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१९** देण्यात येते.

३. आरोपीकडून तिच्या आधार कार्डची प्रत घेतली, त्यावर तिचा निशाणी अंगठाही माझ्यासमक्ष घेतला होता. सदर प्रत दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येते.

४. आरोपी दिपा धनावत यांना पाहिल्यास मी ओळखु शकेल. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस.बी. माने यांच्या आदेशान्वये त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

**उलट तपासणी आरोपीतर्फे वकील श्री. डी.व्ही. पात्रीकर यांचा पुकारा केला असता ते गैरहजर. आरोपी सुध्दा गैरहजर. त्यामुळे उलटतपास नाही.**

**फेरतपास - नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(कि.कां. शाह)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दि.१४.१०.२०२२